महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/ कॅम्प पुणे
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २४/०४/२०२०

# परिपत्रक

**विषय : गटवर्ष २०२०-२०२२ मधील रजा रोखीकरण प्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :** १) सामान्य आदेश क्र. ५९ दि. २७.०६.१९७०.
२) सामान्य आदेश क्र. ११४ दि. २३.०८.१९८२.
३) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र. ९/९१५५ दि. १७.०४.२०२०.

महाराष्ट्र राज्यामध्ये करोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव विचारात घेउन शासनाने घोषित केलेल्या बंद कालावधीमध्ये कंपनीच्या निधीचे योग्य प्रकारे नियोजन तथा आर्थिक व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीकोनातून संदर्भ क्र. ३ मधील परिपत्रकाव्दारे गटवर्ष २०२०-२०२२ या कालावधीतील रजा रोखीकरण अदा करणे ही बाब स्थगित ठेवण्यात आलेली आहे.

२. या अनुषंगाने रजा रोखीकरण प्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालील तपशिलवार मार्गदर्शक सूचना प्रसारीत करण्यात येत आहेत.

अ) रजेचे रोखीकरण करू इच्छिणारे कर्मचारी Empoyee Portal व्दारे रजा रोखीकरणाचा अर्ज सादर करू शकतील.

ब) सक्षम अधिकारी कंपनीच्या प्रचलित नियमांनुसार रजा रोखीकरणास मंजुरी देउ शकतील.

क) मंजूर करण्यात आलेल्या रजा रोखीकरणाची रक्कम मात्र कंपनीची आर्थिक स्थिती सुस्थितीत आल्यानंतर अदा करण्यात येईल.

ड) रजा रोखीकरण अर्जामध्ये जो रजेचा कालावधी नमूद करण्यात आला आहे, सदर कालावधीच्या लगतपूर्व महिन्याचे मूळ वेतन व महागाई भत्ता हा रोखीकरणाच्या गणनेसाठी विचारात घेण्यात येईल.

इ) नजिकच्या काळात सेवानिवृत्त होणारे कर्मचारी गटवर्ष २०२०-२०२२ करीता रजा रोखीकरण घेउ इच्छित असल्यास अशा कर्मचाऱ्यांनी Empoyee Portal व्दारे रजा रोखीकरणाचा अर्ज सादर करावा, सदर कर्मचाऱ्यांना या गटवर्षाचे रजा रोखीकरण सेवानिवृत्तीच्या महिन्यात अदा करण्यात यावे.

फ) सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अंतिम रजा रोखीकरण विद्यमान नियमांनुसार अदा करण्यात येईल.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)